जनसंपर्कअधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


## -:प्रेस नोट :-

दिनांक ०४/०५/२०२६

## ATM मध्ये असलेल्या व्यक्तींचे लक्ष विचलित करून त्यांच्या खात्यातून फसवणूक करणाऱ्या आरोपीतांस अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मिळाले यश

===०००===

दिनांक २६/०३/२०२६ रोजी जळगांव शहरातील बेंडाळे चौक परिसरातील SBI च्या ATM मध्ये तक्रारदार पैसे काढण्यासाठी गेले असता, एका अनोळखी व्यक्तीने त्यांचे लक्ष विचलीत करुन त्यांचे ATM कार्ड बदलले त्यानंतर आरोपीने तक्रारदार यांच्या खात्यातुन धुळे, नंदुरबार, मालेगांव अशा विविध शहरातील ATM मधुन एकुण २,३१,०००/- रुपये काढुन फसवणुक केली होती.या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. १०५/२०२६ BNS कलम ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेता **मा.पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांनी** श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांना आदेशपर सुचना देवुन मार्गदर्शन केले. त्यानुशंगाने श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांनी स्थानिग गुन्हे शाखेचे वेग-वेगळे पथके तयार करुन त्यांना अशा प्रकारचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत योग्य त्या सुचना देवुन आदेशित केले होते

तयार करण्यात आलेल्या पथकाकडुन तांत्रीक विश्लेषण आणि परिसरातील CCTV फुटेजची सखोल पडताळणी केली असता तसेच गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे धुळे येथे सापळा रचुन ATM सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांचे लक्ष विचलित करुन त्यांचे ATM कार्ड हातचलाखीने बदलुन त्यांचे खात्यातुन पैसे लांबविणाऱ्या अंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करत **आरोपी नामे शेख हबीब शेख नवाब वय ५४ रा. लाला सरदार नगर धुळे यांस ताब्यात घेतले आहे.** तर त्याचा दुसरा साथिदार नामे सैय्यक कमालुद्दीन खान वय ३५ रा. साकीनाका, अंधेरी, मुंबई हा फरार असुन त्याच्यावर मुंबई व नवी मुंबई परिसरात (कांदिवली, कामोटे, कळंबोली,वाशी,कारपुबावडी इत्यादी ठिकाणी ) फसवणुकीचे १० हुन अधिक गंभिर गुन्हे दाखल आहेत. पोलीस त्याचा कसुन शोध घेत आहेत.

**सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री.श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. संदिप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन गणापुरे आणि श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वल्टे, पो.हे.कॉ.प्रविण मांडोळे, पो.हे.कॉ. संदिप पाटील, पो.हे.कॉ.हरिलाल पाटील, पो.हे.कॉ. राहुल बैसाणे, पोलीस अंमलदार राहुल कोळी, पोलीस अंमलदार विलास गायकवाड या पथकाने उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.**

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

**प्रति,**
**सर्वसंपादक/वार्ताहार**
**सर्वप्रिंटमिडीया/इलेक्ट्रॉनिकप्रिंटमिडीया**
**२/- जनहितार्थप्रसारणकरीता**

*************************************************************